श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

स्वच्छता साहित्य पुरवठा कामाची जाहीर निविदा.

समितीचे स्वच्छता विभागासाठी स्वच्छता साहित्य १ वर्षभर पूरविणे कामी जाहीर दरपत्रके मागविण्यात येत आहेत. या संबंधीची माहिती, अटी, शर्ती व निविदा फॉर्म तुकाराम भवन, पंढरपूर येथे आणि www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. इकडील नमूना फॉर्ममध्येच दरपत्रक भरून देणेची आहे. तसेच अनामत रक्कम रू. ५,०००/—डी.डी./रोख स्वरुपात भरणे आवश्यक आहे. सिलबंद दरपत्रक कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे नावे दिनांक २५/०६/२०१६ रोजी सायं. ५:०० वाजेपर्यंत पोहोचेल अशी पाठवावी. प्राप्त दरपत्रके दिनांक २६/०६/२०१६ रोजी तुकाराम भवन येथे स.११:०० वा. उघडल्या जातील.

क्र.दर्शनमंडप व स्वच्छता विभाग/कावि/१५/२०१६ दि. १५/०६/२०१६ सही XXX

कार्यकारी अधिकारी

(संपर्क क्र. ०२१८६—२२३५५०, ७०८३०८११९२)

## श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

स्वच्छता साहित्य पुरवठा कामाची जाहीर निविदा.

### माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे.....

१. नमूना दरपत्रकाचा फॉर्म कार्यालयीन वेळेत तुकाराम भवन येथे उपलब्ध होवून मिळतील. तसेच www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळतील. दरपत्रक फॉर्म स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर ठेकेदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि दरपत्रक स्वच्छता साहित्य पुरवठा कामी भरलेली आहे, असा सविस्तर तपशिल नमुद करावा. निविदा समक्ष तुकाराम भवन येथे सादर कराव्यात किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेले दरपत्रके विचारात घेतल्या जाणार नाहीत.

२. अनामत रक्कम रू.५०००/—डी.डी./रोख स्वरुपात भरणे आवश्यक आहे. डी.डी. 'कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर' यांचे नावे काढावा.

३. पुरवठादाराने दरपत्रक फॉर्ममध्ये नमुद केलेल्या दराने जून २०१६ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीत स्वच्छता साहित्याचा पुरवठा इकडील मागणी प्रमाणे करणे आवश्यक आहे.

४. पुरवठा करावयाच्या स्वच्छता साहित्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पुरवठा करावयाच्या वस्तूचा तपशील<br>टिप:— स्वच्छ दर्जेदार स्वरूपात पुरवठा करणे आवश्यक आहे. | अंदाजे वर्षभर पुरवठा करावयाचा माल (किलो/नग/लिटर) | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ब्लिचींग पावडर | २५० किलो | |
| २ | लहान टोच्या पुसणी | ५० नग | |
| ३ | मेडिक्लोर | २०० लिटर | |
| ४ | काथ्या बंडल | १ नग | |
| ५ | वायपर लहान | १० नग | |
| ६ | ब्लॅक फिनेल | ८०० लिटर | |
| ७ | व्हाईट सिंटेड फिनेल | १००० लिटर | |
| ८ | ॲसिड | २५० लिटर | |
| ९ | ओडोपीक पावडर | २० किलो | |
| १० | पांढरी डांबर गोळी | ५ किलो | |
| ११ | रंगीत डांबर गोळी | १०० नग | |

५. मंदिर समितीने ठरवून दिलेल्या अथवा निश्चित केलेल्या नमुन्यांतच मालाचा पुरवठा करणेचा आहे.

६. सर्व साहित्य चांगल्या गुणवत्तेचे असणे आवश्यक आहे.

७. स्वच्छता साहित्य विक्रीची परवानगी असलेबाबत सर्व प्रकारच्या शासकिय परवान्याच्या प्रती निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

८. सदर मालाचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार मुदतीत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरून मालाच्या किमतीच्या ५ टक्के पर्यंत दंड आकारण्यात येईल.

९. माल खराब असल्याचे आढळून आलेस पुरवठा धारकास जबाबदार धरणेत येईल व त्याचे बील अदा केले जाणार नाही.

१०. पुरवठा करण्यात आलेल्या मालाची प्रत व प्रमाण संबंधित विभागाकडून मोजणी व तपासणी करून खात्री झाले खेरीज बील अदा केले जाणार नाही.

११. स्वच्छता साहित्य पुरवठा करणेचे ठिकाण श्री.संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप विभाग, पंढरपूर येथे करणे आवश्यक आहे.

१२. दरपत्रकात नमुद साहित्याचा दर सर्व करासहीत नमुद करावा. साहित्य पोहचविण्याचा वाहतुक खर्च, हमाली अथवा इतर अतिरिक्त कोणताही खर्च पुरवठाधारकास दिला जाणार नाही.

१३. दरपत्रकात नमुद सर्व साहित्यांचा दर नमूद करणे आवश्यक आहे. अपूर्ण दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१४. सदर कामाचे मंजुर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २ टक्के आयकर कपात केली जाईल.

१५. सदर कामासाठी कोणतीही ॲडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

१६. माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस निविदाधारक जबाबदार राहील.

१७. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहील.

१८. निविदा ज्यांचे नांवे मंजूर झालेली आहे त्यांनी रक्कम रूपये १००/— चे स्टॅम्प पेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे (affidivit) प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे.

१९. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

२०. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठा धारकास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर निविदा कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

२१. प्रशासकीय व अन्य कारणास्तव निविदा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

———————‘‘————————

श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

**दरपत्रक फॉर्म**

स्वच्छता साहित्य पुरवठा कामाचे दरपत्रक

प्रति,
मा.कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर.

विषयः— स्वच्छता साहित्य पुरवठा करणेकामी दरपत्रक.

ठेकेदाराचे पूर्ण नाव :— श्री.——————————————————————

पूर्ण पत्ता :— ——————————————————————

——————————————————————

मोबाईल कं.:— ——————————————————————

महोदय,

श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूरचे वतीने स्वच्छता साहित्य पुरवठा कामाची दिनांक /०६/२०१६ रोजीचे दैनिक वर्तमानपत्र—————————— मध्ये प्रसिध्द झालेल्या दरपत्रकाच्या जाहिरातीप्रमाणे आमच्याकडे उपलब्ध असलेल्या स्वच्छता साहित्याचे दरपत्रक खालीलप्रमाणे सादर करीत आहेत.

| अ.क्र. | पुरवठा करावयाच्या वस्तूचा तपशील<br>टिपः— स्वच्छ दर्जेदार स्वरूपात पुरवठा करणे आवश्यक आहे. | ब्रँडचे नांव / दर्जा | परिमाण | दर प्रती किलो / नग/लिटर रक्कम | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अंकी | अक्षरी | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ब्लिचींग पावडर | | किलो | | | |
| २ | लहान टोच्या पुसणी | | नग | | | |
| ३ | मेडिक्लोर | | लिटर | | | |
| ४ | काथ्या बंडल | | नग | | | |
| ५ | वायपर लहान | | नग | | | |

| अ. क्र. | पुरवठा करावयाच्या वस्तूचा तपशील<br>टिपः— स्वच्छ दर्जेदार स्वरूपात पुरवठा करणे आवश्यक आहे. | ब्रँडचे नांव / दर्जा | परिमाण | दर प्रती किलो / नग/लिटर रक्कम | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अंकी | अक्षरी | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ६ | ब्लॅक फिनेल | | लिटर | | | |
| ७ | व्हाईट सिंटेड फिनेल | | लिटर | | | |
| ८ | ॲसिड | | लिटर | | | |
| ९ | ओडोपीक पावडर | | किलो | | | |
| १० | पांढरी डांबर गोळी | | किलो | | | |
| ११ | रंगीत डांबर गोळी | | नग | | | |

वरील दर श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर येथे पोहोच खर्च आणि सर्व प्रकारचे करासहीत आकारण्यात आले आहेत.

सदर दराने ०१ जुलै २०१६ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीत स्वच्छता साहित्य पुरवठा करणेस मी बांधील राहील. तसेच याबाबतच्या आपणाकडून देण्यात आलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून त्यासंबंधीचे जरूर ते प्रतिज्ञापत्र स्टॅम्पपेपरवर करून देण्यास तयार आहे. रू. ५,०००/— अनामत रकमेचा डी.डी./पावतीची झेरॉक्स प्रत सोबत जोडली आहे. तरी वर नमुद दरपत्रकाप्रमाणे स्वच्छता साहित्य पुरवठा करणेचे काम मला मिळण्यास विनंती आहे.

दिनांक     /०६/२०१६                                        पुरवठाधारकाची सही

सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत

१. अनामत रक्कमेचा डी.डी/ रोखीच्या पावतीची झेरॉक्स प्रत.
२. पूर्वी स्वच्छता साहित्य पुरवठा केलेल्या कामाच्या अनुभवाची प्रमाणपत्रे.
३. स्वतःच्या ओळखपत्राची झेरॉक्स प्रत. (उदा. पॅनकार्ड, मतदान कार्ड व आधारकार्ड)
४. मुंबई दुकाने व संस्था अधिनियमामध्ये असलेला परवाना.
५. पॅन कार्ड.